लोकनेते डॉ.बाळासाहेब विखेपाटील(पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित)

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोल्हार

ता.राहाता जि.अहमदनगर पिन-४१३७१०

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

२०१४-१५ पासूनचा पुनर्रचित अभ्यासक्रम

SYBA (SP-1)

व्दितीय वर्ष कला (विशेषस्तर १)

मराठी साहित्यातील विविध प्रवाह

सत्र पहिले : नाटक (नटसम्राट)

प्रा.डॉ.राजेंद्र वडमारे

(मराठी विभाग प्रमुख)

---

# नटसम्राट : एक आकलन

## ०१.प्रास्ताविक

वि. वा. शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' हे मराठी नाट्यसृष्टीतील एक महत्त्वाचे नाटक आहे. या नाटकातून गणपतराव बेलवलकर उर्फ 'आप्पा' या पात्राच्या वृद्धापकाळातील जीवनाची शोकांतिका व्यक्त झालेली आहे. मांडणीच्या दृष्टीने विचार केला तर हे कौटुंबिक नाटक आहे. मात्र त्याचा आशय सामाजिक आहे. समाजात आढळणारी वृद्धांची समस्या या नाटकात अत्यंत तीव्रतेने मांडलेली आहे. ती विचारात घेता 'नटसम्राट' हे कौटुंबिक-सामाजिक-शोकात्म नाटक आहे, असे म्हणता येते.

## ०२.नटसम्राट: आशयसूत्र

गणपतराव बेलवलकर उर्फ 'आप्पा' हे 'नटसम्राट' या नाटकातील मध्यवर्ती पात्र आहे. या पात्राच्या वृद्धापकाळातील शोकांतिका या नाटकात एकूण तीन अंकातून मांडलेली आहे. अप्पा बेलवलकर हे प्रेक्षकांच्या मनोभूमीवर गेली चाळीस वर्ष अधिराज्य गाजविलेले प्रख्यात कलावंत आहेत. त्यांच्या केवळ अंगातच नव्हे ,तर रोमारोमात अभिनय भिनलेला आहे. त्यांच्या या अभिनय प्रतिभेची उंची लक्षात घेऊन रसिकांनी त्यांना 'नटसम्राट' ही पदवी बहाल केलेली आहे.

अशा या नटसम्राट गणपतराव बेलवलकरांना आपल्या अंगात भिनलेल्या अभिनयाचा आणि त्यांनी गाजविलेल्या नाट्यसृष्टीचा कधीच विसर पडत नाही. आणि त्याचवेळी त्यांना सभोवतालच्या वास्तव जगाशी व्यावहारिक तडजोडही करता येत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनाची अटळ शोकांतिका घडून येते. असे या नाटकाचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे.

## ०३.नटसम्राट : कथानकाचा आशय

### ३.१ अंक पहिला

चाळीस वर्ष रंगभूमीची सेवा केलेले आणि रसिकांची मने जिंकलेले गणपतराव बेलवलकर उर्फ 'आप्पा' रंगभूमीवरून निवृत्ती घेतात. याप्रसंगी रसिक-प्रेक्षकांकडून त्यांच्या सेवापूर्तीनिमित्ताने सत्कारसोहळा आयोजित केला

जातो व आप्पांना चाळीस हजार रुपयांची थैली अर्पण केली जाते. यातील दहा हजार रुपये एका सेवाभावी संस्थेला दान देण्याचे ठरवून उर्वरित रक्कम आप्पा आपल्या मुला-मुलीला वाटून देतात.

आप्पांच्या पत्नीचे नाव कावेरी असून आप्पा तिला 'सरकार' म्हणतात. आप्पांना मुलगा नंदा व मुलगी नलू अशी दोन अपत्ये असून दोघांचीही लग्ने झालेली आहेत. आप्पांचा मुलगा नंदा हा एम. कॉम. झालेला असून फिल्डवॉकर,लेरनव्हस्की, तेजपाल अँड को. कंपनीत मोठ्या हुद्द्यावर नोकरीला आहे. नंदा , नंदाची पत्नी शारदा , मुलगी सुहासिनी उर्फ 'ठमी' असे नंदाचे कुटुंब असून त्याला मुंबईत स्वतःच्या मालकीचा फ्लॅट घ्यायचा आहे.

आप्पांची मुलगी नलू ही नाशिकमध्ये राहत असून तिचा नवरा सुधाकर हा डेपो. इंजिनियर आहे. त्याला पुढील शिक्षणासाठी जर्मनीला जायचं आहे. नंदा आणि नलू या दोघांचाही संसार सुखाचा आहे. आप्पा व कावेरी यांनी आपल्याकडे राहण्यासाठी यावे म्हणून सुरूवातीला नंदा आणि नलू असे दोघेही आग्रही असतात.

आपली सर्व संपत्ती दान करण्याचा आप्पाचा निर्णय कावेरीला मात्र आवडत नाही.''माणसं वाईट नसली तरी म्हातारपण वाईट असतं. पुढचं वाढलेलं ताट द्यावं, पण बसायचा पाट,देऊ नये माणसानं.'' असा सुज्ञपणाचा सल्ला ती आप्पाला देते. त्यावर आप्पा तिला वेड्यात काढतात. ''माझी मुलं म्हणजे माझी कोकरं आहेत. ती मला कधीच घराबाहेर काढणार नाहीत'', असा विश्वास प्रकट करतात.

आपली सर्व संपत्ती नंदा-नलूला समप्रमाणात वाटून दिल्यानंतर दहा वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. या दरम्यानच्या कालखंडात बऱ्याच घडामोडी घडल्या आहेत. अप्पाच्या मुलाने म्हणजे नंदाने मुंबईत स्वतःचा फ्लॅट घेतलेला आहे. त्यासाठी आप्पांनी त्याला वीस हजार रुपये दिलेले आहेत. आप्पांनी दिलेल्या पैश्यांमुळे नलूचा नवरा सुधाकरही परदेशात जाऊन आलेला आहे. त्यामुळे त्याचीही नोकरीत बढती झाली आहे. नंदा-नलू दोघेही आपआपल्या संसारात मग्न आहेत. त्यांच्यासाठी आप्पा-कावेरीविषयीची पूर्वीची नवलाई संपली आहे. सुरुवातीला आप्पा-कावेरी यांनी आपल्याच घरी रहावे म्हणून आग्रह करणारे नंदा-नलू आता आप्पा-कावेरीकडे ढुंकूनही बघत नाहीत. त्यांच्या दृष्टीने आप्पा-कावेरी जणू अडगळीला पडलेले आहेत.

आप्पा व कावेरी दोघेही मुंबईला नंदाकडे राहत आहेत. मात्र नंदाच्या घरी त्यांची अवस्था आश्रितासारखी झालेली आहे. कावेरीला बाजार करण्यासारखी घरातली किरकोळ कामे करावी लागतात. त्यामुळे आपल्या नवऱ्याकडे म्हणजे आप्पाकडे लक्ष द्यायलाही तिला वेळ मिळत नाही. नंदाच्या घरातील नोकरांचीही त्यांना आडवितिडवी बोलणी ऐकावी लागतात. अशी आप्पा-कावेरीची दयनीय अवस्था झालेली आहे.

नंदाची मुलगी सुहासिनी, आप्पा तिला 'ठमी' म्हणतात. या ठमीबरोबर आप्पांची विशेष गट्टी आहे. तिच्याबरोबर खेळून ते आपला जीव रमवतात. तिचे लाड करतात. नंदाची पत्नी शारदाला मात्र आप्पांचे असे पोरकट वागणे पटत नाही. तिला ते गावंढळपणाचे आणि वाभ्रटपणाचे वाटते. आप्पांनी नाटकाच्या वेडापाई आपल्या आयुष्याचा सत्यानाश केलाच आहे, ते आता आपल्या मुलीचा , म्हणजे सुहासिनीचाही सत्यानाश करतील अशी शारदाला भीती वाटते. ''शिष्टाचार नाही , सौजन्य नाही , सभ्यता नाही. हे काय घर आहे की ,नाटक मंडळीतल्या उडाणटप्पू लोकांची धर्मशाळा आहे. '' अशा शब्दात ती आप्पांना सुनावते.त्यांना दिवाणखाण्यात येण्यास बंदी घालते. तसेच सुहासिनीबरोबर खेळण्यासही मनाई करते.

शारदा आप्पांबद्दल आपल्या नवर्याजवळ म्हणजे नंदाजवळ तक्रार करते. ''घरात शांतता नाही आणि संसाराला आकार नाही. यांच्या वागण्यामुळे पाहुण्यारावळ्याची रया रहात नाही. सभ्य माणसांना आपल्या घराची धास्ती वाटायला लागली आहे. कशाकरता घर केलं ? काहीतरी निमित्त काढून घरभर फिरतात आणि सगळ्या घराचा उकिरडा करून ठेवतात. यांच्या वागण्याबोलण्याने नोकरमाणसं टिकत नाहीत. सकाळ-संध्याकाळ गुलामासारखे

राबायचे. काय तुमच्या पगाराचा आणि ऐश्वर्याचा उपयोग ? आपण कोणत्या वस्तीत राहतोय , अवतीभोवती कोणाची बिर्हारडं आहेत, आपल्या घराची जगातली प्रतिष्ठा काय आहे , कसलाही म्हणून विचार करायचा नाही. आता हे सारे असह्य झालेय मला. मला तरी घरात ठेवा नाहीतर यांना तरी.'' असे स्पष्ट शब्दात ती नवर्याअला सुनावते.

नंदालाही आप्पांचे नाटकी बोलणे , वागणे खटकत असते. शारदाचे ऐकून तोही आप्पांवर भडकतो. ''आई , आप्पा तुम्ही या घरात सुखान राहावं अशी माझी इच्छा आहे. शारदा रागाच्या भरात वेडंवाकडं बोलली असेल , तर मी माफी मागतो त्याबद्दल. पण एक निक्षून सांगतो , शारदा या घराची मालकीण आहे. आजपर्यंत झालं ते झालं. पण यापुढे तिची तुमच्यासंबंधीची एकही तक्रार माझ्या कानावर येता कामा नये. मला कळतं आहे की , आपली जगं वेगळी आहेत. आम्ही तरुण आहोत. तुमचं म्हातारपण झालं आहे. मुलगा म्हणून माझं कर्तव्य मी जाणतो. पण आपले चिखलाचे पाय आमच्या गालिच्यावर आणून आमचे संसार मलीन आणि अमंगल करण्याचा आम्हाला अधिकार नाही. तुम्ही जमवून घेतलं पाहिजे. मी हजारदा तुमच्या पायांवर डोकं ठेवीन , आप्पा, पण संसाराचा आणि शारदेचा बळी तुमच्या पायांवर देणार नाही.'' असे तो आप्पांना सांगतो.

घरात वावरताना आप्पा-कावेरी या दोघानांही आपल्या मर्यादा संभाळता येत नाहीत, असे नंदा व शारदाला वाटते. तसेच आपणास आता मुलाच्या घरात जागा नाही याची आप्पांनाही खात्री पटते. ते मुलाचे घर सोडण्याचे ठरवतात व मुलीकडे म्हणजे नलूकडे राहण्यासाठी राहीनगरला जाण्याचा निर्णय घेतात.

**३.२. अंक दुसरा**

**३.२.१.प्रवेश पहिला**

नलूच्या घरीही आप्पांचे फारसे उत्साहाने स्वागत होत नाही. याची प्रचिती आप्पांना लवकरच येते. नंदाने निरोप पाठवूनही नलू आप्पा-कावेरीला घेण्यासाठी स्टेशनवर येत नाही. त्यासाठी ती आपला नोकर विठोबा याला पाठवते. आप्पांचा रेल्वेस्टेशन ते नलूचे घर हा प्रवासही धड होत नाही. वाटेत गाडी नादुरुस्त होते.म्हणून विठोबा टांगा करतो.पण टांग्याचेही एक चाक निखळते. शेवटी बैलगाडीतून प्रवास करून आप्पांना नलूच्या घरी यावे लागते.

घरी आल्यावर 'आज आप्पांचा वाढदिवस आहे ' म्हणून सुधाकर आप्पांचे हार घालू स्वागत करतो. नलूही आप्पांचे स्वागत करते. मात्र त्यात फारसा उत्साह जाणवत नाही. केवळ कर्तव्य म्हणूनच ती आप्पांचे स्वागत करते. ''आम्ही आता कायमसाठीच तुमच्या घरी राहण्यासाठी आलेलो आहोत'' , असे आप्पा म्हणताच नलूचा उत्साह मावळतो. तो तिच्या चेहर्याुवर स्पष्ट दिसतो.

नलू आता पूर्णपणे मध्यमवर्गीय झालेली आहे. सुधाकरला कंपनीत बढती मिळून तो आता मोठा इंजिनीयर बनलेला आहे. त्याची नेमणूक 'राहीनगर' या धरणाच्या गावी झालेली आहे. बढती मिळाल्यामुळे सुधाकरच्या घरातील आर्थिक सुबत्ता वाढलेली आहे. ती नलू-सुधाकरच्या राहणीमानातही दिसते. त्यांची दोन्ही मुले आता लोणावळ्याला कॉन्व्हेंटमध्ये शिकत असून घरात नोकरचाकर आहेत. घरातही श्रीमंतीचा थाट आहे.

नलूला आप्पा-कावेरीचे आपल्या घरातील कायमचे राहणे मनातून काहीसे रुचत नाही. ''तुम्ही इथं राहणार , कायमची राहणार याचं खरंच मला फार फार समाधान वाटतंय. जे आमचं आहे ते सगळं तुमचंच आहे असं मानायचं'', असं ती तोंडदेखले म्हणते खरी,पण मनातून ती नाराज आहे हे तिच्या कृतीतून जाणवते.

**३.२.२.प्रवेश दुसरा**

सुधाकरच्या कंपनीचे बॉस कळवणकरसाहेब यांना नाटकाचा छंद आहे. ते आप्पांना भेटण्यासाठी पत्नीसह नलूच्या घरी येतात. नलू घरातील नोकर विठोबाला त्यांच्या स्वागताची तयारी करायला सांगते. कळवणकरसाहेब व सौ.कळवणकर यांना 'हॅम्लेट'हे नाटक नव्या तंत्राने रंगभूमीवर सादर करावयाचे असून त्याविषयी ते दोघेही

आप्पांबरोबर चर्चा करतात. आप्पांना मात्र कळवणकर साहेबांची मते पटत नाहीत . म्हणून ते कळवणकर साहेबांशी जेवढ्यास तेवढे बोलून नाटकाचा विषय टाळण्याचा प्रयत्न करतात. कळवणकर मात्र आप्पांना विषयांतर करू देत नाहीत. ते नाटक या विषयावरच बोलतात.

बोलता-बोलता कळवणकर पतीपत्नी जुन्या लोकप्रिय नटांना नावे ठेवायला लागतात. 'बालगंधर्व,' 'केशवराव,' 'गणपतराव जोशी' अशा लोकप्रिय नटांना भाकड नट म्हणून संबोधतात.त्यांची अवहेलना करतात. आप्पांना ते सहन होत नाही. त्यांची सहनशक्ती संपते. ते संतापाने हातातला भज्याचा पुडा जमिनीवर भिरकावून कळवणकरांवर ओरडतात, "तुम्ही चालते व्हा. माझ्या दैवतांविषयी मी एकही अपशब्द ऐकून घेणार नाही. मला माहित आहे , हे घर माझे नाही, तरीही तुम्ही माझ्यापुढून चालते व्हा."असे म्हणतात.

आप्पांच्या या कृतीमुळे कळवणकर पती-पत्नी नाराज होऊन निघून जातात. नलूला आप्पांचे हे वागणे पटत नाही. आप्पा नलूची क्षमा मागतात. नलू त्यांना रागाने आत घालवते. तिच्या भावनाचा स्फोट होतो. तो ती सुधाकरजवळ व्यक्त करते. 'आप्पामुळे आपले जगणे असह्य होत आहे. त्यांच्यामुळे घरातली शांतता भंग होत आहे. आप्पा वाटेल त्याच्याजवळ पैसे मागतात. रस्त्यावर कुठेही अड्डा घालून बसतात. कोणाजवळ काहीही बोलतात. कुठल्याही हॉटेलमधून काहीही घरी घेऊन येतात. बोलण सुद्धा धड नाही. सारखी शिव्यांची सरबत्ती चालू असते. त्यामुळे घराला घरपण राहिलं नाही,' असे नलूला वाटते. सुधाकर तिला धीराने घ्यायला सांगतो.नलूला सुधाकरचा सल्ला पटत नाही. "मला माझ्या घराचं घरपण राखायचं आहे.मला माझ्या सुखाची ,संसाराची नासाडी होऊ द्यायची नाही." असे सांगून ती आप्पा- कावेरीची व्यवस्था आउटहाऊस मधील एका खोलीत करते. त्यांची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी विठोबावर सोपवते.

**३.२.३.प्रवेश तिसरा**

आप्पा-कावेरी नलूच्या घरी आउटहाऊसमध्ये रहात आहेत. विठोबा हा त्यांच्या सेवेसाठी आहे. विठोबालाही नाटकाची आवड आहे. तो आप्पांना दैवत मानतो व मनापासून त्यांची सेवा करतो. आप्पा-कावेरी त्यांच्या मूळगावी म्हणजे मोरवाडीला जाण्याचे स्वप्न पाहतात. मोरवाडीला स्वत:चे घर बांधून तुळशीवृंदावन उभे करण्याची कावेरीची इच्छा आहे. आप्पांनाही कावेरीची ही कल्पना आवडते.

दरम्यान घरात एक चोरीची घटना घडते. सुधाकरचा पगार गफलतीने दुसऱ्या ठिकाणी ठेवला जातो. तो चोरीला गेल्याची समजून होऊन इतर सर्वांबरोबर नलू आप्पा-कावेरीच्या खोलीचीही झडती घेते. आप्पांनी कावेरीचा चंद्रहार विकून आलेले पैसे आपल्या पेटीत ठेवलेले असतात. ते पैसे बघून नऊला आप्पांनीच पैसे चोरण्याचा संशय येतो. ती तसा आप्पांवर स्पष्ट आरोप करते. मुलीने केलेला चोरीचा आरोप आप्पांना सहन होत नाही. त्यांच्या सहनशक्तीचा अंत होतो. कावेरी आप्पांना शांत करण्याचा प्रयत्न करते. परंतु आप्पांची समजूत पटत नाही.

तेवढ्यात नलूला पैश्याचे पाकीट सापडते. ती आप्पांची क्षमा मागते. "तुमच्या लाडक्या कोकराला माफ करा ," म्हणते. मात्र आप्पा तिला माफ करीत नाहीत. "माझी सर्व लेकरं माझ्यासाठी मेली." असे ते म्हणतात. आप्पांच्या भावनांचा स्फोट होतो. भावनातिरेकाने ते खुर्चीवर कोसळतात. कावेरी त्यांना सावरण्याचा प्रयत्न करते. त्याचवेळी तिच्या छातीत कळ येते. ती मुर्चीत होऊन खाली कोसळते. त्यातच तिचे निधन होते.

**३.३. अंक तिसरा**

**३.३.१.प्रवेश पहिला**

कावेरीच्या निधनानंतर आप्पा भ्रमिष्ट होतात व पंधरा दिवसानंतर नलूचे घर सोडून निघून जातात. सुधाकर मुंबईला नंदाला फोन करतो व आप्पा घरातून नाहिसे झाल्याचे सांगतो. नंदाच्या घरी ठमी उर्फ सुहासिनीनेही आप्पांचा ध्यास

घेतलेला आहे. या पंधरा दिवसात तिला आप्पा दिसल्याचे दोन वेळा भ्रम होतात. नंदू व कावेरी आप्पांचा शोध घेण्यासाठी हवालदिल झालेले आहेत. त्यासाठी त्यांनी पोलिसांकडेही तक्रार दिलेली आहे. विठोबाही नलूच्या घरची नोकरी सोडून आप्पांचा शोध घेण्यासाठी बाहेर पडतो.

**३.३.२.प्रवेश दुसरा**

कुठल्यातरी एका खेडयाच्या जंगलवाटेवर आप्पा भ्रमिष्टासारखे , "कुणी घर देता का घर , एका तुफानाला कुणी घर देता का घर" म्हणत फिरत आहेत. त्यांचा अवतार एखाद्या भिकाऱ्यासारखा झालेला असून त्यांना स्वतःविषयी शुद्धही राहिलेली नाही. अशा अवस्थेत त्यांना शेतात काम करणारा एक शेतकरी भेटतो. त्या शेतकऱ्यांबरोबर झालेल्या संवादातून आप्पांच्या मनातील विफलता व जगण्याविषयीची निरसता स्पष्ट होते ."माणसातील माणूसपण लोप पावल्याची खंत" आप्पा शेतकऱ्याजवळ व्यक्त करतात. "अशा माणसापासून सावध रहा" असा इशारा त्या शेतकऱ्याला देत ते पुन्हा जंगलात निघून जातात.

**३.३.३.प्रवेश तिसरा**

भ्रमिष्ट झालेले आप्पा मुंबईला आलेले आहेत व मुंबईत एका नाट्यगृहाच्या आवारात आश्रयाला थांबलेले आहेत. याठिकाणी एक सोळा सतरा वर्षाचा बूट पॉलिशवाला मुलगा आप्पांना सांभाळतो आहे. आप्पा त्याला 'राजा' म्हणतात. राजा प्रेमळ असून तो आप्पांची बापासारखी काळजी घेतो. त्यांना 'बाबा' म्हणतो. आप्पा व राजाची चांगले भावनिक नाते जुळून येते.

नाट्यगृहात नाटक बघण्यासाठी आलेले दोन प्रेक्षक आप्पांजवळ येतात व नटसम्राट गणपतराव बेलवलकरांच्या आठवणी सांगतात. त्या आठवणी ऐकून आप्पा त्यांना "नटसम्राट गणपतराव बेलवलकर मेला आहे" असे सांगतात. त्यावर त्या प्रेक्षकांचा विश्वास बसत नाही.ते आप्पांना वेड्यात काढून निघून जातात.

आप्पांचा शोध घेत विठोबा येतो. तो आप्पांना ओळखतो व नंदा नलूला कल्पना देतो. आप्पांना भेटण्यासाठी नलू-सुधाकर,नंदा-शारदा-सुहासिनी, इन्स्पेक्टर जाधवराव असे सर्वच येतात. आप्पांची अवस्था पाहून त्या सर्वांनाच धक्का बसतो. ते आप्पांना घरी येण्याची विनंती करतात. ठमी आप्पांच्या कमरेला मिठी मारते. मात्र आप्पा आता सर्व बंधनांच्या पलीकडे गेलेले आहेत. हे लोक आप्पांना घेऊन जाणार म्हणून राजा त्यांना विरोध करतो. यावरून इन्स्पेक्टर जाधवराव राजाला मारहाण करतात. ते पाहून आप्पांचा तोल ढळतो. ते प्रचंड चिडतात.

आप्पा नटसम्राटच्या आवेशात इन्स्पेक्टर जाधवरावांना , "या तलवारी म्यानबंद करा" असे खणखणीतपणे बजावतात. आप्पा शेवटच्या क्षणी ठमीला व राजाला जवळ घेतात आणि बाकीच्या सर्वांना दूर सारतात. आवेशाने स्वत:शी 'ज्युलियस सीझर'चा संवाद म्हणतात. हा संवाद म्हणता म्हणताच आप्पा जमिनीवर कोसळतात. आप्पांना सावरण्यासाठी सगळे धावतात. त्या सर्वांना दूर सारून आप्पा राजाला जवळ घेतात आणि मग , "असं नाटक असतं राजा, असं नाटक असतं" असे म्हणत प्राण सोडतात.

**०४.नटसम्राट : प्रमुख व्यक्तिरेखा**

**४.१. आप्पा उर्फ गणपतराव बेलवलकर**

गणपतराव बेलवलकर उर्फ आप्पा आपल्याला नाटकात दिसतात ते साठीनंतरचे. पण त्या आधीचा त्यांचा जीवनप्रवास, त्यांची जडणघडण यांचे विपुल निर्देश नाटकात आहेत. त्यातून त्यांच्या पूर्वजीवनाचे एक सुसंगत चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते.

वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षी अनाथ झालेले आप्पा पुढे जीवनाची वाटचाल सावली नसलेल्या वाळवंटातूनच करतात. यावेळी 'पायाला जाळीत होती जमीन आणि मस्तकावर जाळीत होते आकाश ,' असा त्यांचा प्रवास होता.

या जळत्या प्रवासातच ‘आपल्याला रंगभूमीवर आणि रंगभूमीसाठी जगायचे आहे ’ असा त्यांना साक्षात्कार होतो. आणि मग त्यांच्या होरपळणाऱ्या आयुष्याला एक सुंदर अर्थ लाभतो. पुढे चाळीस वर्ष आप्पा रंगभूमीच्या एका वेगळ्याच विश्वात जगतात. रंगभूमीवर अनेक भूमिका गाजवून ‘नटसम्राट’ या पदवीपर्यंत पोहोचतात.

“मराठी रंगभूमीचा सार्वभौम राजा , नटसम्राट गणपतराव बेलवलकर. गणपतराव जोशांचा पट्टशिष्य. खाडिलकर-गडकरी यांसारख्या दैवतांनी ज्याच्या पाठीवर हात ठेवला असा कलावंत. लोकमान्यांच्या आशीर्वादाचे भाग्य लाभलेला नटश्रेष्ठ. लक्षावधी रसिकांच्या आशीर्वादामुळे कुबेराहून श्रीमंत आणि इंद्रापेक्षा भाग्यवान ठरलेला रंगदेवतेचा पुजारी.” अशी आप्पांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण होते.

रंगभूमी गाजवणाऱ्या आप्पांनी एक कुटुंबवत्सल गृहस्थ म्हणूनही आपली जबाबदारी चांगल्या तऱ्हेने पार पाडली आहे. त्यांच्या सुखी संसाराचा बराच तपशील नाटकात वेळोवेळी आलेला आहे. कर्तबगार पत्नी , कर्तबगार मुले , समजूतदार सून-जावई , असे त्यांच्या सुखी संसाराचे लोभस चित्र आहे. या संसारात आप्पांना जे मिळते ते त्यांनी कर्तबगारीने मिळविले आहे. आणि याचा त्यांना रास्त अभिमानही आहे.

कावेरी हा आप्पांच्या मर्मबंधाचा एक पिळदार धागा आहे. “लग्नाच्या जुगारखाण्यात अशी बाई हाती हाती लागणे हे भाग्य.” असे ते पत्नीविषयी कृतज्ञतेने म्हणतात. आप्पांना खरी विश्रांती जर कोठे लाभत असेल , तर ती कावेरीच्या सावलीत. लौकिकतेची, मानमान्यतेची अहंमतेची सारी शिडे मिटवून आप्पा नावाचे गलबत कावेरी नावाच्या बंदरात शांतपणे विसावते,सुखावते आणि जीवनाची नवनवीन स्वप्ने पाहू लागते.

वात्सल्याची तहान ही आप्पांची ओढ आहे. रंगभूमीचे विश्व आपणहून सोडल्यावर त्याच्या बदली कौटुंबिक प्रेमाचे एक मधूर विश्व आपल्याला मिळेल , असे त्यांना वाटते. पण पुढे लवकरच त्यांचा भ्रमनिरास होतो. त्यांच्यावर झालेल्या नको त्या आरोपांनी त्यांचे मन नासून जाते. त्यांचे दुःख त्यांच्या हृदयात भडकून उठते. “माझे एक लाडके कोकरू होते , पण आता कुठे आहे ते ? माझा भ्रम होता तो. गोजिरवाण्या कोकरासारखी एक मुलगी होती. एक कशासारखा मुलगा होता. पण खरे म्हणजे माझे ते कोणीच नव्हते. आभाळ पाठीवर घेणाऱ्या हत्तींना विचारून पहा , ते सांगतील कोणीच कोणाचे नसते.” असा दाहक प्रत्यय त्यांना येतो.

आयुष्यभर रंगभूमीवर ‘नटसम्राट’ म्हणून जगणार्याआ आप्पांना कलावंतांच्या विश्वातून खाली उतरून रुपयाभोवती फिरणाऱ्या पृथ्वीवरील माणसांच्या विश्वात वावरणे-जगणे अवघड होते. वृद्धत्त्वामुळे मुलांच्या विश्वातून ते बाजूला फेकले जातात. आणि कलावंत असल्यामुळे ते तडजोडही करू शकत नाहीत. त्यांचे वृद्धत्व , त्यांचे कलावंत असणे , त्यांच्या मनातील अहंकाराचा पीळ त्यांना भोवतालच्या जगाशी तडजोड करू देत नाही. जे अरिष्ट कावेरी शांतपणे पचवू पाहते ते आप्पांना पचविता येत नाही. त्या विषारी अनुभवांनी त्यांच्या अंगाचा भडका उडतो. त्यातूनच त्यांची शोकांतिका घडून येते.

बाहेरच्या लौकिक जगातले आघात जेव्हा असह्य होतात , तेव्हा आप्पा संवादी नाट्यप्रसंगांच्या स्मृतीत स्वत:ला गुरफटून घेतात. कलावंतांच्या सर्जनशील सामर्थ्याच्या आधारावर ते हे सारे घाव झेलतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा एक अगदीच वेगळा असा विशेष आहे. पृथगात्म व्यक्तिमत्व , परिस्थितीशी आणि स्वतःची चाललेला झगडा व कथानकावरील सर्वत्र पसरलेली छाया ही शोकनाट्याच्या नायकाची सारी वैशिष्ट्ये आप्पांच्या व्यक्तिमत्वाला प्राप्त झालेली आहेत. शिरवाडकरांच्या दिव्य प्रतिभेचा स्पर्श लाभलेली ही एक हृदयस्पर्शी व्यक्तिरेखा आहे. ती मराठी नाट्यसृष्टीतील एक देशीकार लेणे ठरते.

**४.२. कावेरी**

'नटसम्राट' मध्ये गणपतराव बेलवलकर यांच्या खालोखाल महत्वाची आणि लोभस व्यक्तिरेखा कोणाची असेल तर ती कावेरीची होय. शिरवाडकरांनी कावेरीचे व्यक्तीरेखाटन अगदी बारकाव्याने व कौशल्याने केले आहे. मात्र त्यावरचे आदर्शवादी रंगही लपून नाहीत. तत्कालीन कालखंडातील स्त्री ही पतीसेवेत आयुष्याची सार्थकता शोधणारी होती. याचे प्रतिबिंब कावेरीच्या व्यक्तिमत्वा दिसते. महाराष्ट्रीयन मध्यमवर्गीय पतीव्रतेचा एक अस्सल नमुना शिरवाडकरांनी कावेरीच्या रूपाने प्रस्तुत नाटिका चित्रित केला आहे.

"लग्नाच्या जुगारखाण्यात अशी बाई हाती लागणे हे भाग्य." असे गणपतराव कावेरीविषयी कृतार्थतेने म्हणतात. "सरकार, तुम्ही मला पन्नास वर्षे साथ दिलीत , भागीदारी केलीत , पण त्या गोष्टीतल्या पहारेकर्यातप्रमाणे मला मिळालेल्या नजराण्यात तुम्ही अर्धा हिस्सा कधी मागितला नाही. हिस्सा नेहमी हट्टाने मागितलात आणि घेतलात तो फक्त फटके खाण्यामध्ये. असेल ते शिजवले , मिळेल ते पांघरले. शेकोटीत ढलपीचे जिणे तुम्ही स्वीकारलेत. दुसर्याकसाठी जळण्याचे आणि तेही हसूनखेळून जळण्याचे." यातून कावेरीचे व्यक्तिमत्व उभे राहते. कावेरी नवऱ्याच्या प्रकृतीची सतत काळजी घेते. त्याच्यासाठी स्वेटर विणणे तिला अजूनही आनंद आहे. या बारीक-सारीक गोष्टीतून तिची समर्पणशीलता दिसते.

पूर्वायुष्यात आप्पा बेलवलकर बरेचसे आत्मकेंद्रित होऊन जगले. त्यामुळे कावेरीचे पत्नी म्हणून जगलेले आयुष्य जणू तापल्या तव्याबरोबर संसार करण्यासारखे होते. अर्थात , कावेरी पत्नी म्हणून नवरा नावाच्या गलबतासाठी बंदरासारखी असली , तरी तिच्या कुशीत आल्यावर साऱ्याच जखम आप्पांनी उघड केल्या असतील असे नाही. म्हणूनch आयुष्याच्या संध्याकाळी नवऱ्याच्या मैत्रिणी आपल्या सवती तर नव्हत्या ना , अशी शंका तिला येते. पण पतीच्या प्रांजळ कबुलीने तिचे मन नि:शंक होते. "मला हवे होते ते सारे मिळाले , जे मिळाले नसेल ते हवे होते कुणाला? ते मिळावे अशी कल्पना देखील आली नाही मनामध्ये." या उद्गारातून तिच्या मनाच्या समाधानी वृत्तीचे दर्शन घडते.

कावेरी एक स्त्री आहे आणि स्त्रीला असणारी एक उपजत बुद्धी तिच्याजवळ आहे. मुलांना सारे काही वाटून देण्याच्या आप्पांच्या निर्णयाला "ताटात काय आणि वाटीत काय , एकच." असे म्हणून ती उदारपणे संमती देते. पण त्याचवेळी "माणसाने पुढ्यातले ताट द्यावे पण बसायचा पाट देऊ नये." असा इशारा द्यायलाही ती चुकत नाही. "माणसे वाईट नसली तरी म्हातारपण वाईट असते." हे ती पुरेपूर जाणून आहे. बायकांचे म्हणून जे एक उपजत शहाणपण असते , ते तिच्याजवळ भरपूर आहे. ती सारे पाहते , अनुभवते , ओळखते , सोसते आणि प्रसंग येताच न बोलता करायचे ते करते.

नवऱ्याशी पूर्णपणे एकरूप झालेली पत्नी आणि मुलांवर जीवापाड प्रेम करणारी आई , ही दोन्ही कावेरीचीच रुपे आहेत. पण नवरा आणि मुले यांच्या संघर्ष उभा राहिल्यावर ती नवऱ्याच्या बाजूने उभी राहते. मुलाच्या घरातून तीच प्रथम बाहेर पडते आणि आप्पा तिच्यामागून मुकाटपणे चालू लागतात. मुलीच्याही घरून ती निघतच होती आणि पुन्हा आप्पा तिच्यामागे जाणारच होते. पण तिची प्रकृती तिला साथ देत नाही.

मुलांजवळ राहण्यात आणि त्यांना सोडून जाण्यात केव्हा , कशी शोभा आहे , हे जाणण्याची आणि ती आचरणात आणण्याची ताकद कावेरीच्या ठायी आहे. ती कर्तबगार , जिद्दी आणि कष्टाळू आहे. म्हणूनच मोरवाडीचे स्वप्न ती रंगवू शकते. "मोरवाडीला गेल्यावर सुखासमाधानाचे देऊळ उभे करीन मी माझ्या देवासाठी. हे सारे अमंगळ स्वप्न आपण विसरून जाऊ. माझी कूस वांझ राहिली असेच मी समजते. आपली साथ आहे तोपर्यंत कशाचीही पर्वा नाही मला. मी मनाने खचले नाही. तुमच्या हाताचा आधार मिळाला तर कुठल्याही वादळवाऱ्यात दगडासारखी उभी

राहीन. कुठल्याही काळोखातून तुमच्यासाठी रस्ता काढीन.'' असा निर्धार ती व्यक्त करते. कावेरीची पतीनिष्ठा , मुलांनी तिला दिलेल्या वेदना आणि त्यावर मात करण्याची खंबीर जिद्द तिच्या बोलण्या वागण्यातून ठळकपणे दिसून येते.

आप्पा आणि कावेरी या वृद्ध पती-पत्नीच्या सहजीवनाची रूचिर चित्रण 'नटसम्राट'मधून होते. कावेरीचा मृत्यू हा आप्पांवर विलक्षण आघात करणारा ठरतो. कावेरीच्या मृत्यूने या वृद्ध दांपत्याच्या शोककथेचा पूर्वार्ध पूर्ण होतो. एकूणच कावेरीचे चित्र आदर्शवादाकडे झुकलेले असले तरी ते जिवंत, भावस्पर्शी आणि उठावदार झालेले आहे.

**४.३. नंदा बेलवलकर**

नंदा हा अप्पांचा थोरला मुलगा. कथानकाच्या दृष्टीने नंदाची व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. कारण नंदामुळेच कथानकातील संघर्षाचे बीज आप्पांच्या जीवनात अंकुरते व त्यांनतर त्यांच्या सुखी आयुष्याला तडे जातात.

नंदा हा कर्तव्य निभावणारा व प्रतिष्ठा जपणारा आहे. तसाच तो प्रेमळ , आणि नम्रही आहे. मात्र तो परिस्थितीला शरण जाणाराही आहे.त्याची ही वृत्तीच त्याच्या मूळ प्रतिमेला तडा देणारी आहे. पहिल्या अंकामध्ये आप्पा आपल्या कुटुंबाची ओळख करून देताना नंदाचाही परिचय करून देतात. एम. कॉम. झालेला नंदा फिल्डवॉकर ,लेरनव्हस्की, तेजपाल अँड को. कंपनीत मोठ्या हुद्द्यावर नोकरीला आहे. यातून त्याची कर्तबगारी दिसते.

नंदाच्या मनात वडिलांविषयी श्रद्धा व आदर आहे. ''एवढा मोठा झाला , पण शेफारला नाही, उतला-मातला नाही. अजून उठल्या सुटल्या आमच्या पायावर डोके ठेवतो.'' असे आप्पा त्याच्याविषयी म्हणतात. आप्पा आणि कावेरी यांनी सतत आपल्याकडेच राहावे असे नंदाला वाटते. आई-वडिलांना सांभाळणे हे आपले कर्तव्य आहे , याची त्याला जाणीवही नंदाला आहे.

परंतु पुढे हळूहळू परिस्थिती बदलते. नंदा वरिष्ठ पातळीवरचा प्रतिष्ठित अधिकारी होतो. फ्लॅटमध्ये राहायला जातो. त्यानंतर त्याच्या संसाराचे स्वरूप बदलते आणि उच्चभ्रू संस्कृतीचा पगडा त्याच्यावर दिसू लागतो. ही संस्कृती आणि परिस्थिती त्याला बदलायला भाग पाडते.

वडिलांविषयी नंदाच्या मनात अपार प्रेम आहे. त्यांचा मान, आदर राखलाच पाहिजे, असेही त्याला प्रकर्षाने वाटते. परंतु तो ज्या सोसायटी राहतो , तिथल्या प्रतिष्ठेला आप्पांच्या वागण्याने बाधा येते. समंजस नंदा काही काळ आप्पांचे वागणे सहनही करतो. मात्र जेव्हा आप्पा आणि शारदा यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो , तेव्हा नंदा विचित्र कोंडीत सापडतो. वडिलांचे वागणे पत्नीला पसंत नाही. पत्नीची भूमिका रास्त आणि वडिलांच्याही वागण्याला आवर घालता येत नाही. वडील की पत्नी, की प्लॉट संस्कृतीमधील प्रतिष्ठा अशा संघर्षात नंदा सापडतो.

शारदेची आप्पांविषयीची तक्रार नंदाच्या घरातील संघर्षाचे प्रतिबिंब उभी करणारी आहे. पत्नीचे हे दुःख नंदा पाहतो आणि वडिलांविषयी अपार आदर असलेला पूर्वीचा नंदा पत्नीच्या बाजूने उभा राहतो. ''माझ्या संसाराचा आणि शारदेचा बळी तुमच्या पायावर देणार नाही'' असे वडिलांना सांगतो. यानंतर आप्पा व कावेरी नंदाचे घर सोडून नलूकडे निघून जातात.

नंदाकडून आप्पांना घर सोडण्यास भाग पाडणारी वागणूक मिळते , ती केवळ नंदावर असलेल्या परिस्थितीचा प्रभाव म्हणूनच. वस्तुतः वडिलांविषयीचा आदर नंदाच्या मना शेवटपर्यंत आहे. आप्पांनी घर सोडल्यानंतर नंदा नलूला पत्र पाठवतो. त्यांची विचारपूस करतो. आणि शेवटी त्यांची माफीही मागतो.

**४.४. नलू उर्फ कालिंदी कार्लेकर**

नलू ही आप्पांची अत्यंत लाडकी मुलगी. नलू ही नाशिकमध्ये राहत असून तिचा नवरा सुधाकर हा डेपो. इंजिनियर आहे. नंदा आणि नलू या दोघांचाही संसार सुखाचा आहे. आप्पांच्या मनात नलूविषयी आत्यंतिक जिव्हाळा असून तिला ते लाडके कोकरू म्हणून संबोधतात. नलूच्या मनातही आईवडिलांविषयी श्रद्धा आणि आदराची भावना आहे.

आप्पा जेव्हा मालमत्तेची वाटणी करतात , तेव्हा नलू व्याकूळ होते. "आम्हाला काही नको आप्पा , फक्त तुम्ही हवे आहात." हे तिचे उदगार तिच्या अंतरी असलेला जिव्हाळा स्पष्ट करतात.

नंदूच्या घरी बारा वर्षे राहिले आप्पा-कावेरी नलूकडे कायमचे राहण्यासाठी येतात , तेव्हा नलूला आनंद होतो. मात्र हा आनंद फार काळ टिकत नाही. लवकरच नलूच्या मनातील आईवडिलांविषयीचे कौतुक ओसरते आणि हळूहळू आप्पांचा त-हेवाईकपणा तिच्या संसाराला खुपू लागतो. आप्पांची कलंदर वृत्ती दिवसेंदिवस वाढतच जाते. ते रस्त्यावरील रामभैय्याकडची भजी आणून खातात. घरातील कपाट विस्कटून टाकतात. घरभर कागद फेकीत कचरा करतात. कपाटातील बहुमोल चंदनाचा हत्ती जमिनीवर फेकून देतात. आप्पांचे हे वागणे नलूसाठी त्रासदायक ठरते.

आप्पांच्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या कलंदर वृत्तीमुळे नलूच्या मनातील प्रेमाची जागा हळूहळू असंतोषात व त्याचे रूपांतर शेवटी रागात होऊ लागते. त्यातच कळवणकर पती-पत्नीच्या संदर्भात आप्पाकडून कळत-नकळत घडलेला प्रसंग नलूला मन:स्ताप देणारा ठरतो. त्यामुळे ती संतप्त होते. तिच्या सहनशीलतेची मर्यादा संपते व ती आप्पांची रवानगी आउटहाऊसमध्ये करते.

नलू आप्पांची मुलगी आहे. मात्र त्याच वेळी ती एका इंजिनियरची जबाबदार पत्नीही आहे.या दोन्ही भूमिका तिला एकाचवेळी निभावता येत नाहीत. आप्पांमुळे आपल्या घराचे घरपण संपू नये , आपल्या पतीची मानसिक कोंडी होऊ नये असे तिला वाटते. आणि त्याचवेळी आई-वडिलांना सांभाळावे म्हणूनही तिचे मन तळमळते. पण तिलाही शेवटी नंदाप्रमाणेच अटळ आणि अपर्याय परिस्थिती नाकारता येत नाही. उच्चभ्रू संस्कृतीचा पगडा व प्रतिष्ठेच्या कल्पना तिलाही नडतात.

नलूच्या मनातील आईवडिलांविषयीचे प्रेम आणि पत्नी म्हणून असणारी कर्तव्ये यातील संघर्ष शिरवाडकरांनी समर्थपणे उभा केला आहे. वस्तुतः नलू ही प्रेमळ , समंजस आणि कर्तव्यपरायण आहे. पण परिस्थिती तिला बदलायला भाग पडते.

नलूच्या घरी घडलेला चोरीचा प्रसंग आप्पांसाठी कडवट अनुभवाचा कळस ठरतो. नलूला आप्पांचा संशय येतो आणि विणण्याच्या सूर्याचे निमित्त करून ती आउटहाऊस पूर्ण झडती घेते. कावेरीच्या ट्रंकेत पैसे दिसतात आणि नलूचा असा समज होतो की , आप्पांनीच पैसे चोरले.ती स्पष्टपणे आप्पांवर चोरीचा आरोप करते. अत्यंत कठोर बोलते. पुढे नलूला पैशाचे पाकीट सापडते. आप्पांच्या बँकेतील पैसे कावेरीच्या चंद्रहाराचे होते हाही उलगडा होतो.

यानंतर मात्र नलू पश्चातापाने होरपळू लागते. ती आप्पांची क्षमायाचना करते. परंतु आप्पा तिला क्षमा करत नाहीत. शेवटी मुंबईमध्ये जेव्हा आप्पा सापडतात तेव्हाही नलू आप्पांना "आप्पा तुमच्या लाडक्या कोकरावरचा राग अजूनही गेला नाही का?" असा हळवा प्रश्न विचारते. यातून तिच्या कोमल अंत:करणाचे दर्शन घडते.

**<u>४.५.सुहासिनी उर्फ ठमी</u>**

सुहासिनी म्हणजे आप्पांची लाडकी नात ठमी. नंदा-शारदा यांची गोड चुणचुणीत मुलगी. बारा वर्षांनंतर आप्पा नंदाच्या घरात अडगळ ठरतात. तेव्हा त्यांच्यासाठी ही ठमीच आनंदाचा झरा ठरते. तिच्या हसण्या-रुसण्यात , बालिश बडबडीत आप्पा मनापासून रंगून जातात. तिच्या हट्टासाठी "ऊन्हामधल्या म्हातार्याणला फक्त तुझा हात दे" असा संदेशही देतात. या संदेशात आप्पांची अगतिकता जशी दिसते , तसे त्यांच्या भावजीवनातील ठमीचे महत्त्वही प्रकट होते.

अशा या लाडक्या नातीला जेव्हा आप्पांपासून बळजबरीने दूर करण्यात येते , तेव्हा आप्पा खचून जातात. "आपण गावंढळपणाची दीक्षा देऊन ठमीच्या आयुष्याचा सत्यानाश करीत आहोत" हा शारदेचा आरोप आप्पांसाठी फारच जीवघेणा ठरतो. नंदाच्या घरून जाताना ठमीचा निरोप घ्यायची उर्मी दाबून ठेवणे आप्पांना असहाय्य होते.

राहीनगरच्या स्टेशनवरही आप्पांना ठमीचा  भास होतो. पुढे मनाच्या भ्रमिष्ट अवस्थेतही आप्पा आपल्या या लाडक्या नातीला विसरत नाहीत.

आप्पा हे निरागस, ताज्या मनोवृत्तीचे आहेत. व्यवहाराचे संकेत सांभाळून वागणे त्यांना जमत-मानवत नाही. त्यांचे सारे वागणे आपल्या अंतःकरणाच्या उर्मीनुसार घडणारे आहे. या वृत्तीचे बालवृत्तीशी साम्य आहे. म्हणूनच आप्पांना ठमीचा लळा लागतो. त्यांच्यात जवळीक निर्माण होते. लहान मूल आणि वृद्ध यातील भावनिक नाते हळव्या तरलतेने येथे प्रकट झाले आहे. त्याचे भावनात्मक आवाहन हा मोठे आहे. त्यामुळे ठमीला  'नटसम्राट'मध्ये विशिष्ट स्थान प्राप्त होते.

## ४.६.विठोबा

विठोबा हा हा नलूचा घरगुती नोकर. "आप्पा, आमचा विठोबा दहा पोरांच्या ठिकाणी आहे." या नलूच्या उद्गारातून त्याच्या  धांदरट-गडबड्या स्वभावाची ओळख पटते. विठोबा काही दिवस नाट्यसृष्टीत वावरलेला होता. नाटकात हलकीसलकी कामे करण्याइतकी त्याची प्रगती झालेली होती. त्यामुळे त्याच्या अंगात नाटक भिनले होते ते कायमचेच. आपल्या अंगातले नाटक तो कधीच विसरत नाही.

विठोबाचे नाटकप्रेम आणि त्याच्या मानगुटीवर बसलेले   'हॅम्लेट'च्या बापाचे भूत यामुळे नाटकात प्रेक्षकांना हसू आणणारी गंमत निर्माण होते. फोनवरून आपल्या मालकिणीशी बोलताना विठोबा     'घरगडी' आणि  'हॅम्लेटच्या बापाचे भूत ' अशा दोन्ही भूमिकातून एकदमच बोलतो. "फ्रिजमध्ये सरबताच्या बाटल्या-चंद्रसेना   , असे नीच कर्म फ्रीजमधून-तिच्याकडून घडले तरी कसे  ?" अशी मजेदार गल्लत त्यातून जन्माला येते. नाटकमंडळीत वावरलेला विठोबा घरकाम करतानाही नाटकातील वाक्ये अधून-मधून पेरीत राहतो. त्यामुळे  'नटसम्राट'मध्ये हास्यरस खळाळत राहतो.

तरीही विठोबा हे केवळ विनोदासाठी वापरलेली पात्र नाही. आप्पांविषयी त्याच्या मनात भक्तिभाव आहे. नलूच्या घरून आप्पा जेव्हा नाहीसे होतात, तेव्हा त्यांचा शोध घेण्यासाठी विठोबा नलूची नोकरी सोडतो. यातून विठोबाचे एक वेगळेच दर्शन घडते. त्याच्या व्यक्तिरेखेला एक नवे परिमाण प्राप्त होते. विठोबा आप्पांचा माग काढीत मुंबईला जातो आणि आप्पांची सर्वांबरोबर भेट घडवून आणतो.

विठोबा निष्ठावंत आहे. ही निष्ठा एका नाटकवाल्याला नाटकाबद्दल एका सामान्य नटाला नटश्रेष्ठाबद्दल वाटणाऱ्या भक्तीतून निर्माण झालेली आहे. या भक्तीयुक्त निष्ठेमुळे तो त्यागालाही तयार होतो. जीवनात काही मूल्यांना मानणारा  , एक सहृदय निष्ठावान माणूस म्हणूनच विठोबा प्रेक्षकांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण करतो.

## ४.७. कळवणकर पती-पत्नी

'नटसम्राट'च्या दुसऱ्या अंकाच्या दुसर्या् प्रवेशात कळवणकर पती-पत्नी आपल्याला भेटतात. आप्पांच्या वागण्याविषयी नलूच्या मनात काहीसा सूक्ष्म तिरस्कार निर्माण होतो. त्याच पार्श्वभूमीवर कळवणकर पती-पत्नी आणि आप्पा यांच्या तिचा भेटीचा नाट्यपूर्ण प्रसंग घडतो.

कळवणकर हे सुधाकरचे म्हणजे आप्पांच्या जावयाचे बॉस आहेत. ते मुळातच नाट्यक्षेत्रात लुडबुड करणारे गृहस्थ आहेत. कळवणकर पती-पत्नी या दोघानांही नाटकाचा नाद आहे. मुंबईच्या  आर्ट थिएटरमध्ये त्यांनी कामे केलेली असून एखाद-दुसरे पारितोषिकही त्यांनी मिळवलेले आहे.

आप्पासाहेब जुन्या रंगभूमीवरचे नटसम्राट. आप्पांच्या तुलेनेत कळवणकर अगदीच उथळ आहेत. त्यांच्या बोलण्यात नवशिक्या हौशी माणसाचा उथळपणा आणि दिमाख पुरेपूर आहे. याच भरात ते जुन्या कलावंताविषयी तुच्छतेने बोलतात. त्यांना क्षमा करण्याची आढ्यतेखोर भाषा बोलतात. यावरून आप्पा व कळवणकर पती-पत्नी

यांच्यात खटका उडतो. चिडलेले आप्पासाहेब त्या दोघांनाही रागाच्या भरात घराबाहेर काढतात. याच प्रसंगानंतर नलूकडून आप्पांची रवानगी आउटहाऊसमध्ये होते.

कळवणकर पती-पत्नी नाट्यप्रेमी असले तरी उथळ, अहंमन्य व नव्या गोष्टीच्या सोसात बुडालेले आहेत. त्यांच्यावर रुपाने नव्या-जुन्या पिढीच्या संघर्षाचे आणखी एक रूप प्रकट होते. त्यातील विसंवादाने त्यांची मुलाखत नाट्यपूर्ण होते. त्यातून कळवणकर पती-पत्नी बरोबर आप्पा , नलू आणि सुधाकर यांचेही व्यक्तिदर्शन घडते. तसेच आप्पांची आउटहाऊसमध्ये रवानगी झाल्यामुळे नाटकाचे संविधानही पुढे सरकते. म्हणून कळवणकर पती-पत्नी थोडावेळ नाटकात येत असले तरी नाट्यदृष्ट्या महत्वाचे कार्य साधतात असेच म्हणावे लागते.

**४.८.राजा**

राजा आपल्याला भेटतो तो 'नटसम्राट'च्या अखेरच्या प्रवेशात. आई-वडिलांनी हाकलून दिलेला , पंधरा वर्षाचा हा पोरगा मुंबईत थिएटरजवळ बूटपॉलिश करतो. पुलाजवळच्या उघड्या झोपडीत सुखाने राहतो. या अडाणी , दरिद्री पोराच्या हृदयातील माणुसकी जागी आहे. म्हणूनच भ्रमिष्ट अवस्थेतल्या आप्पांना तो आधार देतो. त्यांना नेणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांशी झगडतो. त्यासाठी पोलिसाचा मारही खातो.

राजाच्या रूपाने नव्याने जाणवणारा हा माणुसकीचा कोंब असा तुडवला जाऊ पाहताच आप्पा गरजतात आणि 'नटसम्राट'च्या उच्चतम भूमिकेवर आरु dh होऊन नाटक आणि जीवन यातील भेद मिटवित आपली शोकपूर्ण जीवनयात्रा संपवितात.

राजाचा अशिक्षितपणा , त्याच्या बकाल जीवनातले वाक्प्रचार , स्टोरी-व्हिलन-टायटल याविषयीच्या त्याच्या अपेक्षा यातून हास्य निर्माण होते. पण नाटकाचे शोकात्म स्वरूप आणि माणुसकीला जपणारी प्रकृती यांना धक्का लागणार नाही, अशाच पद्धतीने शिरवाडकरांनी येथे भाष्य फुलविले आहे.

लेक-सून, मुले-माणसे असून अनाथ झालेले आप्पा ,आणि आई-बाप , भाऊ-बहीण असून अनाथ झालेला राजा यांना एका दुनियेचे रहिवासी करून शिरवाडकरांनी माणसामाणसातील नाती म्हणजे काय ? या मानवी जीवनाच्या मूलतत्वांची करून दिलेली जाणीव अर्थपूर्ण आहे.

**०५.समारोप**

'नटसम्राट' हे मराठी रसिकांच्या हृदयात कायमचे स्थान निर्माण केलेले नाटक आहे. या नाटकात प्रामुख्याने एक वृद्ध पिता व त्याची मुले यांच्या कौटुंबिक ताणाचे चित्रण आहे.दोन पिढ्यांमधील अटळ संघर्षच लेखकाने त्यातून उभा केला आहे. या संपूर्ण नाटकाची मांडणीही भावनेला आवाहन करीन ,अशीच आहे. ठराविक साच्याच्या कौटुंबिक भावना जागृत करण्याची , त्यांना प्रतिसाद निर्माण करण्याची मोठी शक्ती या नाटकात आहे. यामुळे गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नंतरची मराठीतील श्रेष्ठ शोकात्मिका म्हणून 'नटसम्राट'चेच नाव घेतले जाते.

**०६.संदर्भ**

१.मो.द.ब्रम्हे : 'नटसम्राट आणि किंग लिअर', कुसुमाग्रज प्रतिष्ठान,नाशिक,१९७२

२.ग.वि.अकोलकर/बा.वा.दातार : 'कुसुमाग्रज: साहित्य समीक्षा', कुसुमाग्रज प्रतिष्ठान,नाशिक,१९७६

३.शोभना देशमुख : 'शिरवाडकरांची नाटके', कुसुमाग्रज प्रतिष्ठान,नाशिक,१९८१

४.गो.तु.पाटील : 'नटसम्राट समीक्षा', कुसुमाग्रज प्रतिष्ठान,नाशिक,१९८५

*नियतकालिके

१.आलोचना, जानेवारी-१९७३, एप्रिल-१९७२

२.ललित, सप्टेंबर -१९७२

३.सत्यकथा, मार्च- १९७४